# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १६/०९/२०२६ (बुधवार )

.........................................................................................

## मौदा पोलीसांकडुन घरफोडी प्रकरणात ०७ दिवसांत अंतिम अहवाल सादर; विधी संघर्ष बालकास दोषसिद्धी

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. शशांत एन एम, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सारीन दुर्गे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांच्या नेतृत्वाखाली तपास अधिकारी पोलीस हवालदार श्री संदीप कडु यंनी मौदा पोलीस स्टेशन येथे दाखल घरफोडीच्या गुन्हयाचा जलद गतीने तपास करून न्यायालयात भक्कम पुरावे सादर केल्याने विधी संघर्ष बालकास दोषसिद्धी झाली आहे.

दिनांक ३१/०८/२०२६ रोजी मध्यरात्री फिर्यादी विशाल रामकृष्ण वासनिक, वय ३५ वर्ष, रा. माथणी, ता. मौदा, जि. नागपूर यांच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात व्यक्तीने घरातील अलमारीतून २१ ग्रॅम सोन्याचे दागिने किंमती ७०,३००/— रूपये चोरून नेले होते. याप्रकरणी मौदा पोलीस स्टेशन अंतर्गत अप. क्र. ६०५/२०२६, कलम ३३१ (४), ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. मौदा पोलीसांनी सदर गुन्हयाची तात्काळ उकल करून सदर गुन्हयात एका विधी संघर्ष बालकांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. पोलीसांनी विधीसंघर्षग्रस्त बालकाच्या ताब्यातून चोरीस गेलेला पूर्ण मुद्देमाल २१ ग्रॅम सोन्याचे दागिने, किंमत ७०,३००/—रूपये असा संपुर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सखोल तपास करून तपास पूर्ण करून अवघ्या ०७ दिवसांत अंतिम अहवाल (Final Report) बाल न्याय मंडळ, नागपूर येथे दाखल करण्यात आला. मा. न्यायदंडाधिकारी श्रीमती जे. के. चैनानी आणि व्ही. आर. पांढरे यांच्या बाल न्याय मंडळ,

**नागपूर न्यायालयात चाललेल्या जलद खटल्याच्या संपरीक्षेदरम्यान संबंधित विधीसंघर्ष बालकास दोषसिद्ध ठरवून दिनांक १५/०९/२०२६ रोजी आर्थिक दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०२ लाख ०७ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक १५/०९/२०२६ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा सालई जंगल शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौजा सालई जंगल शिवार येथे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) नरेंद्र किसन पिलगेर, वय ३६ वर्ष, २) मंगेश अशोक मडावी, वय ३४ वर्ष, ३) राजु समारू धुर्वे, वय ४८ वर्ष, ४) गगन दिलीप पिलगेर, वय २६ वर्ष, ५) प्रविण जमुनाप्रसाद राउत, वय २७ वर्ष, ६) प्रदिप हरिचंद भारसाकरे, वय ३० वर्ष, ७) विजय किसन वरती, वय २३ वर्ष, ८) घनराज हरी वाघाडे, वय ५० वर्ष, ९) मूलचंद नथू वरखडे, वय ३४ वर्ष, सर्व रा. सालई, ता. रामटेक, जि. नागपुर यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि १) रोख रक्कम १९७०/—रूपये, ०४ मोटरसायकल, इतर साहित्य असा एकुण २,०७,०२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.नमुद ०९ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## सावनेर शहरात जड वाहने व वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरूध्द सावनेर पोलीसांची कारवाई;
## नो एन्ट्री (No Entry) आणि नो पार्किंग (No Parking) च्या एकुण ११९६ केसेस करून ५ लाख ९८ हजारांचा दंड वसूल

दिनांक १६/०९/२०२६ चे एका वृत्तपत्रात जड वाहनांमुळे सावनेर शहरात अपघाताचा धोका वाढला अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. परंतु सावनेर शहर व परिसरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी सावनेर पोलीसांकडून जड वाहने तसेच अनधिकृत पार्किंगवर सातत्याने कायदेशीर कारवाई केली जात आहे.

माहे जानेवारी २०२६ ते आजपावेतो सावनेर पोलीसांनी जड वाहनांच्या अनधिकृत प्रवेशाविरोधात ५१८ नो–एन्ट्री (No Entry) केसेस दाखल केल्या असून, २,५९,०००/– इतका दंड वसूल केला आहे.तसेच नो–पार्किंग (No Parking) केसेस बाबत शहरात अव्यवस्थित वाहन उभे करणाऱ्यांवर ६७८ केसेस नोंदवण्यात आल्या असून, ३,३९,०००/– इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

माहे जानेवारी २०२६ ते आज पावेतो (No Entry) आणि नो पार्किंग (No Parking) च्या एकूण ११९६ केसेस अंतर्गत ५,९८,०००/– दंड वसूल करून नियमभंग करणाऱ्यांविरूध्द कारवाई करण्यात आली आहे. सावनेर शहरात वर्दळीच्या वेळेत जड वाहनांच्या अनधिकृत प्रवेशास आळा घालण्यासाठी आणि शहरातील वाहतूक व्यवस्था सुरक्षित ठेवण्यासाठी सावनेर पोलीस प्रशासनाकडून ठिकठिकाणी योग्य व स्पष्ट नो एन्ट्री (No Entry) फलक लावण्यात आले आहेत. तसेच गडकरी चौक, गांधी चौक आणि खापा चौक यांसारख्या प्रमुख ठिकाणी सावनेर पोलिसांची नियमित गस्त व तपासणी सुरू असते. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहील. नागरिकांनी व वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन नागपुर ग्रामीण पोलीसांकडुन करण्यात येत आहे.

# अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०८ गुन्हे दाखल, १९ हजार ९४ रूपयांचा मुद्देमाल जप्त

**दिनांक १५/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०८ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे १) प्रमोद धनराज रंगारी, वय ५४ वर्ष, रा. सावळी २) चेतन बोरकर, रा. सावळी, ३) प्रफुल शिंगाडे, रा. सेलु याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) अजय भिमराव घुबडे, वय २९ वर्ष, रा. खरबी नाका, ता. जि. भंडारा २) संतोष तेजरामजी धार्मिक, वय ४३ वर्ष, रा. पेट्रोलपंप स्वामी विवेकानंद कॉलोनी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत आरोपी नामे शुभम गजाननराव धुंडे, वय ३१ वर्षे, रा. पारडसिंगा ता. काटोल जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** १) रनजीत महादेव देवगडे, वय ४७ वर्ष, रा. डोरली, ता. पारशिवनी, जि. नागपूर २) सुनील प्रकाश इंगोले, वय ३८ वर्ष, रा. तामसवाडी, ता. पारशिवनी, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन मोहपा अंतर्गत** आरोपी नामे सुशिल उर्फ सुनिल शेट्टी गांजा राजपुत, वय ३२ वर्ष, रा. डोंगरगाव ता. काटोल, ह.मु. पारधी बेडा तिंडगी, ता. कळमेश्वर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत** आरोपी १) जॉय रॉबीन पराजपे, वय १८ वर्ष, रा. क्वार्टर क्र ८०, हवामहल वाघोडा सावनेर, ता. सावनेर २) अमन धनोले सावनेर, ता. सावनेर यांचेवर ०१ गुन्हा नोंद

**नमुद कारवाईत एकुण २५७४० मिली देशी दारू, ६० लिटर मोहाफुल दारू, १३०० लिटर रसायन सडवा, इतर साहित्य असा एकुण १९,९४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद

दिनांक १५/०९/२०२६ रोजी **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत आरोपी १) **करन जगदीश बंचपाल, वय २६ वर्ष, रा. सुभाष नगर, एच. बी टाउन भंडारा रोड, पावर हाउस चा बाजुला नागपुर जि. नागपूर २) अनिल विश्वप्रसाद विश्वकर्मा, वय २४ वर्ष, रा. भवानी नगर, पुनापुर चौक नमुनारायणी काँनमेन्ट जवळ पारडी नागपुर** हे मौजा शिव टेकडी मंदीर परिसर पारशिवनी ठिकाणी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. नमुद आरोपींवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत मौदा — नागपूर राष्ट्रीय महामार्गा बाबत....

**दिनांक १६/०९/२०२६ चे एका वृत्तपत्रात मौदा — नागपुर महामार्गाची दुरावस्था ३० किमी अंतरावर ३०० हुन अधिक खड्डे अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे.**

**मौदा—नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याच्या दुरवस्थेबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्ताच्या अनुषंगाने मौदा पोलीसांनी तात्काळ सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान संबंधित रस्त्यावर वृत्तात नमूद केल्याप्रमाणे खड्डे आढळून आले नाहीत, तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) वतीने महामार्गाच्या देखभाल—दुरुस्तीचे काम नियमितपणे करण्यात येत आहे. रस्त्यावर कुठेही खड्डे किंवा रस्त्याच्या पृष्ठभागाचे नुकसान निदर्शनास आल्यास राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) च्या संबंधित यंत्रणेमार्फत तात्काळ आवश्यक दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येते.**

**वाहनचालकांना सुरक्षित व सुरळीत प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी महामार्गाची नियमित पाहणी व देखभाल करण्यात येत असून, नागरिकांकडून रस्त्याच्या स्थितीबाबत प्राप्त होणाऱ्या सूचनांचीही संबंधित यंत्रणेकडून दखल घेतली जाते.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर